# शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे

५ फोटोझिंको पथ, जी.पी.ओ.च्या मागे पुणे-४११००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२५८०८/२६१२४७५९
E-mail ID : gpzp.pune@maharashtra.gov.in

## शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणाची जाहिरात २०२४

या मुद्रणालयात सन २०२४ पासून सुरु होणाऱ्या सत्राकरिता खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी म्हणून भरती करावयाची असल्याने इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | उदिमाचे नाव | प्रशिक्षण कालावधी | शैक्षणिक अर्हता | भरावयाची एकूण पदे | अजा | अज | इमाव | खुला | वयोमर्यादा | विद्यावेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुस्तक बंधक | ०२ वर्षे | किमान १० वी उत्तीर्ण | ११ | ०२ | ०१ | ०३ | ०५ | किमान १५ वर्षे पुर्ण | महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित शासन नियमाप्रमाणे |
| २ | प्लेट मेकर | ०२ वर्षे | | ०२ | ०१ | - | - | ०१ | | |
| ३ | मशिन माईंडर | ०२ वर्षे | | ०३ | - | ०१ | ०१ | ०१ | | |
| | | | **एकूण** | **१६** | **०३** | **०१** | **०२** | **१०** | | |

- शैक्षणिक अर्हता - महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण व मराठी भाषेचे उत्तम ज्ञान आवश्यक.
- शैक्षणिक अर्हता व इतर दस्तऐवज –
  १. एस. एस. सी. उत्तीर्ण गुणपत्रिका
  २. आधारकार्ड
  ३. मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र
  ४. अधिवास प्रमाणपत्र
  ५. उच्च व उन्नत गटात नसल्याचे प्रमाणपत्र व इतर सर्व अनुषंगिक आवश्यक कागदपत्रे
- ऑनलाईन अर्ज करण्याचा अंतिम दिनांक १०/०२/२०२४ चे रात्री १२.०० वाजेपर्यंत राहील.
- उमेदवारांना http://apprenticeshipindia.gov.in वरील Candidate Instruction Manual मधील सर्व सुचनांचे पालन केल्याची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज सादर करावा. उमेदवाराने सद्यस्थितीत कार्यान्वित असणारा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. सदर माहिती चुकीची असल्याने संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पुर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.
- इच्छुक असलेल्या उमेदवारांनी http://apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावरील आस्थापना नोंदणी क्र. E04222700102 यावर ऑनलाईन अर्ज सादर करावा तसेच मुलाखतीस शैक्षणिक व इतर अर्हतेबाबतचे सर्व मूळ कागदपत्रे साक्षांकित प्रतींसह कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.
- अर्जातील कोणत्याही दाव्यासंबंधी मुळ कागदपत्र सादर न केल्यास उमेदवारास अपात्र ठरवण्यात येईल.
- अंतिम तारखेनंतर अर्ज सादर केल्यास सदर अर्जाचा विचार केला जाणार नाही व शिकाऊ उमेदवार पोर्टलवर संपुर्ण प्रोफाईल अद्ययावत करावे. प्रोफाईल अद्ययावत नसलेल्या उमेदवारांचा सदरच्या निवड प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

कृ.मा.प...

CamScanner

- शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट स्कॅन करून योग्य रीतीने ऑनलाईन अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही.
- उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.
- सदर शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेसेबंधातील संपूर्ण अधिकार या आस्थापना प्रमुखांस राहतील व त्यांचा निर्णय हा अंतिम असेल.
- पात्र उमेदवारास नियमानुसार या आस्थापनेशी करार करावा लागेल, त्यातील नमुद अटी, शर्ती हया प्रशिक्षण कालावधी दरम्यान लागू असतील.
- भरती प्रक्रियेदरम्यान कुठल्याही उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडून दबाव आणल्यास त्या उमेदवारास भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.
- विद्यावेतन, उपस्थिती, रजा व इतर अनुषंगिक बाबी प्रचलित शासन नियमाप्रमाणे असतील.
- शिकाऊ उमेदवार हे प्रशिक्षण असून शासकीय नोकरी नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच उमेदवारांनी सदर प्रशिक्षण पुर्ण केल्यामुळे या मुद्रणालयात नोकरी मिळण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(स. ह. केदार)
प्र. व्यवस्थापक
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व
महा. शासनाचे छायाचित्रण तज्ज्ञ,
पुणे.

CS CamScanner